INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF HUMANITIES AND INTERDISCIPLINARY STUDIES
( Peer-reviewed, Refereed, Indexed & Open Access Journal )
DOI : 03.2021-11278686 ISSN : 2582-8568 IMPACT FACTOR : 5.828 (SJIF 2022)

# सत्कार्योत्तेजक सभेच्या स्व. श्रीमती जा. र. देशपांडे मुक्तद्वार वाचनालयाचे वाचन चळवळीतील योगदान

## (Contribution of Satkaryottejak Sabha's Late Mrs. J. R. Deshpande Muktadwar Library to the Reading Movement)

**प्रा. डॉ. पी.एस. सोनवणे**
संशोधक मार्गदर्शक
क.ब.चौ.उ.म.वि., जळगाव,
प्राचार्य श्रीमती वि.उ.पाटील कला व
कै. डॉ.भा.स. देसले विज्ञान महाविद्यालय,
साक्री, जि. धुळे

**दुर्गेश मोतीलाल खैरनार**
संशोधक विद्यार्थी
क.ब.चौ.उ.म.वि., जळगाव,
मु.पो. नकाणे. ता.जि. धुळे
E-mail: durgeshkhairnar555@gmail.com

**DOI No.** 03.2021-11278686 **DOI Link ::** https://doi-ds.org/doilink/02.2022-96188559/IRJHIS2202005

***सारांश :***

*यशस्वी जीवनाला अज्ञानाचा फार मोठा अडथळा असतो. ते अज्ञान नाहीसे करून सर्व संबंधित क्षेत्रात पुरेसे ज्ञान संपादन करणे व जीवन यशस्वी करणे शक्य असते; परंतु ज्ञानाच्या त्या त्या क्षेत्रात प्रत्यक्षात उतरावे लागते. समाज हा ज्ञानी व प्रबुद्ध झाला पाहिजे. समाजातील प्रत्येक व्यक्ती संपादित ज्ञानावर भौतिक व आध्यात्मिक विकास साध्य करून आपला उपयोग समाजासाठी व राष्ट्रासाठी झाला पाहिजे. महाराष्ट्राचे 'सांस्कृतिक तीर्थ' अशी ओळख लाभलेल्या मोजक्या संस्थांमध्ये धुळ्याच्या सत्कार्योत्तेजक सभेचा समावेश होतो. धुळ्यात १८९३ मध्ये सत्कार्योत्तेजक सभेची स्थापना झाली. सन १९८५ मध्ये मुक्तद्वार वाचनालयाची स्थापना झाली.*

***शोधसंज्ञा :*** *वाचनालय, ग्रंथ, वाचक*

**प्रस्तावना :**

शब्द, ग्रंथ आणि ग्रंथालयांचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. ग्रंथ हे गुरू होत आणि ते उत्तम संस्कार देतात. म्हणून ग्रंथांना आयुष्यभर पुरणारी ग्रंथाची शिदोरी म्हटले जाते. चांगल्या ग्रंथाचे वाचन नेहमी हितावह ठरते. सार्वजनिक ग्रंथालय हे सुजाण व सुसंस्कृत नागरिक तयार करण्याचे सांस्कृतिक केंद्र आहे. ग्रंथालय समाज विकासाचे एक महत्वाचे साधन आहे. त्यामुळे ग्रंथालयांना राष्ट्राची संपत्ती मानली जाते. सुरूवातीला गवताच्या छपरात, झोपडीत किंवा एखाद्या लहान खोलीत सुरू झालेली ग्रंथालये आज भव्य दिव्य इमारतीत आहे. आज ती नुसती भौतिक साधनानेच संपन्न झालेली नाहीत तर विविध सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, ऐतिहासिक उपक्रम राबवून त्यांनी आपले अस्तित्व

सिद्ध केले आहे. सत्कार्योत्तेजक सभेचे 'स्व. श्रीमती जा. र. देशपांडे मुक्तद्वार वाचनालय' हे सुद्धा आपले एक वेगळेच अस्तित्व राखून आहे.

**उद्दिष्टे :**

सत्कार्योत्तेजक सभेचे स्व. श्रीमती जा. र. देशपांडे मुक्तद्वार वाचनालयाच्या ऐतिहासिक वाटचालीचा थोडक्यात आढावा घेणे.

**गृहितके :**

१. ग्रंथालयाच्या स्थापनेत असणाऱ्या व्यक्तींचे योगदान माहिती होते.

२. ग्रंथालयातील वाचक वर्ग व वाचन साहित्य यांची माहिती होते.

३. ग्रंथालयाच्या वाटचालीशी निगडीत आर्थिक बाबींची माहिती होते.

**संशोधन पद्धती :**

प्रस्तुत संशोधनासाठी ऐतिहासिक व वर्णनात्मक संशोधन पद्धतीचा वापर केला आहे.

**ऐतिहासिक पार्श्वभूमी :**

धुळयात इ. स. १९ मे १८९३या दिवशी सत्कार्योत्तेजक सभेची स्थापना झाली. एके रात्री धुळयातील ४ नागरीक करंदीकरांच्या माडीवर एकत्र जमले व पुण्याच्या सदवर्तन प्रवर्तक मंडळीच्या धर्तीवर एक मंडळ स्थापण्याचे ठरविले व त्यास सत्कार्योत्तेजक मंडळी असे नाव दिले. हे चार धुळेकर म्हणजे कै. नानासाहेब देव (इ.स. १८७१ ते इ.स.१९५८) , कवि विनायक जनार्दन करंदीकर, श्री. माधवराव घाणेकर, श्री. काशिनाथ पाडुरंग तथा काका पिंपळखरे. त्यानंतर न्यू इग्लिश स्कूल, खोलगल्ली या शाळेचे हेडमास्टर श्री गणेश जनार्दन आगाशे यांच्या अध्यक्षतेखाली नागरिकांची सभा भरली. त्यामध्ये सत्कार्योत्तेजक मंडळीची स्थापना अधिकृतपणे करण्यात आली. नंतर 'मंडळी' च्या ठिकाणी 'सभा' हे नाव घालण्यात आले.देशकार्य करावयाचे, समाजात देशसेवची स्फूर्ती उत्पन्न करावयाची, ज्ञानज्योत प्रदीप्त करावयाची अशी तरूणांना कार्य प्रवृत्त करणारी ध्येयसरणी राहावी म्हणून स. सभेचा जन्म झाला. "संस्थेची सन १८५३ ते १९०५ अशी सुरवातीची १२ वर्ष बाल्यावस्था होती. या तपश्चर्येची फलश्रुती म्हणजे 'समर्थांचा दासबोध' सन १९०५ मध्ये विजयादशमीस स. सभेतर्फे प्रकाशित करण्यात आला. नंतर १९३२ मध्ये जांबेत समर्थ मंदिर झाले. श्री समर्थ वाग्देवता मंदिर आकाराला आले (सन १९३५). समर्थ संघाची स्थापना झाली( सन १९४०). मुक्तद्वार वाचनालय सुरू झाले ( सन १९७९) व भारतीय विद्या संशोधन केंद्र उभे राहिले (सन १९९३). स. सभेमार्फेत समर्थ विचार, समर्थ वाडमय, अन्य संत साहित्य व संस्थावृत्त यांचा प्रचार करण्यासाठी 'रामदास आणि रामदासी' हे त्रैमासिक प्रसिद्ध केले जाते. मासिकाचा पहिला अंक सन १९१५ मध्ये प्रकाशित करण्यात आला. समर्थ वाग्देवता मंदिरात सर्व भारतीय भाषांमधील कागदपत्रे आहेत. साधारण १०० ते ६०० वर्षापूर्वीची ही कागदपत्रे ज्यात संस्कृत, उर्दू आणि प्राकृत भाषेचाही समावेश आहे. त्याशिवाय देवनागरी, मोडी लिपीतीलही कागदपत्रे आहेत. शिवकालीन व समर्थकालीन हस्ताक्षरांचे नमुने व ग्रंथ संग्रहांसोबत अनेक चमत्कृतीपूर्ण वस्तुही येथे आपले लक्ष वेधून घेतात. यामध्ये इ. स. १९२० मध्ये ग्रॅड डफसाठी प्रतापगडाच्या देवीचे शिक्के उतरविलेला कागद,

बोटाच्या चिमटीत मावतील एवढ्या दोन भगवतगीता, दोन ताम्रपट, एकाच कागदावर मावतील असे २०५ मनाचे श्लोक, श्रीसमर्थ शिष्य-प्रशिष्य-सांप्रदायिक अशा महान थोर ग्रंथकारांचे विविध भाषांमधील ग्रंथ, अनेक बखरी, त्याशिवाय व्याकरण, संगीत, रागदारी, जमाखर्च, गणित, मंत्रतंत्र, आयुर्वेद, व्रतवैकल्ये, ज्योतिष, संगीत, यंत्रे, शिक्के-मुद्रा, मजकूर आकार, तुलसी रामायण, ऐतिहासिक दस्ताऐवज अशा अंदाजे ३ हजार २०० च्या आसपास ग्रंथातील बहूविध विषयांवर संशोधन येथे पूर्णात्वास आले आहे. सत्कार्योत्तेजक सभेचे दि. ५/४/१९७९ या दिवशी अभ्यासकांसाठी फार पूर्वीपासून अस्तित्वात असलेल्या ग्रंथालयाचे (१) समर्थ वाग्देवता मंदिर (संदर्भ ग्रंथालय), (२) सर्वांसाठी सत्कार्योत्तेजक सभा मुक्तद्वार वाचनालय व ग्रंथालय, धुळे असे २ स्वतंत्र विभाग सुरू केले.

**सेवाव्रत ग्रंथपाल** :

के. सो. मंगलाताई वेशंपायन यांनी वाचनालयाच्या स्थापनेपासून ते सन १९९६ या कालावधीपर्यंत सेवाव्रत ग्रंथपाल पद सांभाळले. के. सो. मंगळताई शरद वैशंपायन यांनी आपल्या परिवारासह वाचनालयास अपत्याप्रमाणे, तळहातावरील फोडाप्रमाणे जपले व वाढविले होते वाचनालयात कार्यरत असणाऱ्या सेवकवर्गात अत्यंत खेळीमेळीने वावरत असत. किंबहुना आपल्या मुलांप्रमाणे इतर सेवकांना वागवित असत. वाचनालयास लागणारे छोटे-मोठे लेखनसामग्री, इतर साहित्य त्या स्वत: खर्च करून आणीत असत.

**कै. सौ. मंगलाताई वैशंपायन महिला विभाग** :

कै. सौ. मंगलाताई वैशंपायन यांच्या कुटुंबीयांनी दिलेल्या देणगीमुळे वाचनालयाने महिला विभागाचे "के.सो. मंगलाताई वैशंपायन महिला विभाग' असे नामकरण करण्यात आले. अमृतमहोत्सवी स्मृतिग्रंथ / २९५ यशस्वी वाटचालीची दखल घेऊन शासनाकडून मार्च सन २००२ ला तालुका 'अ' वर्ग दर्जा प्रदान करण्यात आला याबद्दल तत्कालीन मा. ग्रंथालय संचालक मा. श्री. मेश्राम साहेब, सहाय्यक ग्रंथालय संचालक मा. श्री. म. वि. उरणे, ग्रंथालय निरीक्षक श्री. ओ. पी. ढोणे यांची संस्था त्रशृणी आहे यावेळी वाचनालयाचे माजी अध्यक्ष कै. क. द. देशमुख व माजी कार्यवाह श्री. ज. ह. करवीर यांचे फार मोलाचे सहकार्य आहे. तसेच कै. मंगलाताई वैशंपायन यांच्या निधनानंतर वाचनालयाचे कामकाज थोडे दिवस ठप्प झाल्यामुळे, त्या परिस्थितीत कर्मचारी वर्गाने वाचनालयास माजी ग्रंथपाल श्री. राजेश वर्मा व सध्याचे ग्रंथपाल श्री. रविकिरण बागुल, सहाय्यक ग्रंथपाल गोरख सूर्यवंशी, लिपिक मनिष बीडकर यांच्या मदतीने वाचनाळयास चालना मिळाली. यांचे कार्य पाहून माजी कार्यवाह श्री. ज. ह. करवीर यांनी रु.४०,०००/- ची देणगी देऊन "ग्रंथ देवघेव विभाग व कार्यालयासाठी' "करवीर दालन (हणमंत बाळाचार्य करवीर यांचे स्मरणार्थ) ची निर्मिती करण्यात आली.

**वाचनालयाचे नामकरण :**

दि. २२ ऑक्टो. २००४ रोजी श्री. दत्तात्रय रघुनाथ देशपांडे व श्रीमती अंजली अशोक ओक यांनी रु.२,७५,०००/- देणगी दिली व त्यांच्या इच्छेप्रमाणे वाचनालयाचे नामकरण 'सत्कार्योत्तेजक सभेचे स्व. श्रीमती जानकीबाई रघुनाथ देशपांडे' मुक्तद्वार वाचनालय असे करण्यात आले.

**राजा राममोहन रॉय ग्रंथालय प्रतिष्ठान, कोलकत्ता यांचे मार्फत मा. ग्रंथालय संचालक, महाराष्ट्र 'झेरॉक्स यंत्र' भेट :**

सन २०११-१२ या वर्षांत वाचनालयाच्या कामाने प्रभावित होऊन मा. ग्रंथालय संचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे शिफारशीने राजा राममोहन रॉय ग्रंथालय प्रतिष्ठान कोलकत्ता यांचेकडून रु. ३८२२०/- चे झेरॉक्स यंत्र भेट मिळाले.

**सांस्कृतिक कार्यक्रम व स्पर्धा परीक्षा :**

श्री समर्थ रामदासांनी सांगितल्याप्रमाणे शरीर मजबुतीकरता बलोपासना व मनावर उचित संस्कारासाठी 'मनाचे श्लोक' आवश्यकता सांगितली आहे. त्याप्रमाणे वाचनालय योगासन, सूर्य नमस्कार, मनाचे श्लोक पाठांतर,चित्रकला, हस्ताक्षर, निबंध स्पर्धा यांचे यशस्वी आयोजन करीत असते. या संपूर्ण स्पर्धेचे स्पर्धा प्रमुख म्हणून श्री ज. भा. उपासनी हे काम पाहातात. वाचनालय हे एक कुटुंब असून, वाचक हा या कुटुंबाचा प्रमुख घटक असल्याने त्यांच्या अडीअडचणी मांडण्याच्या दृष्टीने तिळगूळ समारंभ व वाचक मेळावा या कार्यक्रमाचे आयोजन केले जाते.

**वाचन साहित्य व ग्रंथसंपदा :**

"ग्रंथालय ही वर्धिष्णू संस्था आहे" असे ग्रंथालयशास्त्राचे जनक डॉ. शि. रा. रंगनाथन यांनी म्हटले आहे. त्याप्रमाणे वाचनालय हे वाचन साहित्य ग्रंथसंपदेने अधिकाधिक समृद्ध होत आहे. त्याचा आढावा खालीलप्रमाणे घेता येईल- वाचनालयात मराठी, हिंदी, इंग्रजी भाषेतील दैनिक वर्तमानपत्रे-२०, साप्ताहिक- १२, पाक्षिक- ०५, मासिक- ६० व दिवाळी अंक-६० इत्यादी वाचनसाहित्य विपुल प्रमाणात उपलब्ध असून, वाचनालयाची ग्रंथसंपदा ही २२,६२१ एवढी आहे. यात संस्कृत, मराठी, हिंदी, इंग्रजी, गुजराथी, अर्धमागधी, पाली भाषेतील शास्त्रीयग्रंथ, धार्मिक, ऐतिहासिक, चरित्र, आत्मचरित्र, कथा, कादंबऱ्या, नाटक, प्रवासवर्णने, एकांकिका, बालसाहित्य तसेच महाभारत, रामाणय, श्रीमद्भागवत, दासबोध, वेद, पुराणे, उपनिषद, आरोग्य, तत्त्वज्ञान, ज्योतिष, आयुर्वेद, निसर्गोपचार तसेच सर्व धर्मीय ग्रंथ, स्पर्धा परीक्षेसंबंधी व बालसाहित्य विपुल उपलब्ध आहे. दरवर्षी वाचनालय रु.८४०००/- ची ग्रंथ खरेदी करून ग्रंथ संपदेत भर टाकीत असते. याशिवाय दात्यांच्या कडून भेटीच्या स्वरूपात मिळालेल्या ग्रंथांची मोलाची भरपडत असते. आज मुक्तद्वार वाचनालयाचे स्वतंत्र अंग होऊन ३३ वर्षे पूर्ण झाली आहेत.

**वाचनालयाची दालने :**

१) सर्वसामान्य वाचकांसाठी प्रशस्त दालन २) विद्यार्थ्यांसाठी अभ्यासाकरिता स्वतंत्र दालन ३) के. मंगलाताई वेशंपायन महिला दालन ४) बालकांसाठी स्वतंत्र दालन ५) ग्रंथदेव-घेव करिता "करवीर दालन ६) वाचनालयाकरिता स्वतंत्र प्रशासकीय कार्यालय अशी सहा दालने वाचकांसाठी उपयोगात आणली जातात. वर्षभरात १० ते १५ हजार स्त्री, पुरुष व बालवाचक याचा लाभ घेत आहेत. वाचनालयात पुस्तकांनी सुशोभित केलेली ६२ कपाटे आहेत. तसेच १० मोठी व मध्यम आकाराची ८ टेबल्स, १५ बाके आणि २५ खुर्च्या आहेत.

**परिरक्षण अनुदान :**

मा. ग्रंथालय संचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबईयांचेकडून दरवर्षी वाचनालयास रु.२, ५६,०००/- परिरक्षण

अनुदान मिळते.

**वाचनालयाची गरज :**

वाचनालयाची आजची परिस्थिती पाहाता दिवसेंदिवस वाचकांची तसेच वाचन साहित्यांची, ग्रंथसंपदेची संख्या वाढतच आहे, तरी या वाढत्या संख्येला समायोजित करण्यासाठी इमारतीचा विस्तार होणे आवश्यक आहे तरी स्वतंत्र खोल्या बांधणे, फर्निचर, कपाटे याकरिता दात्यांनी सढळ हाताने मदत करावी ही विनंती.

**व्यवस्थापन :**

वाचनालयाची प्रगती व उत्कर्ष होत आहे यांचे श्रेय वाचनालयाचे कार्यरत असलेले अध्यक्ष- वसंत रा. जोशी, कार्यवाह- अनिल वि. साठ्ये, कोषाध्यक्ष- पद्माकर खं. वैद्य व कार्यकारी सदस्य तसेच वाचक, सभेवर प्रेम करणारे आणि वाचनालयाचे सेवक वर्ग १) श्री. रविकिरण अ. बागुल (एम. ए. बी. लिब.) – ग्रंथपाल २) श्री गोरख ए. सूर्यवंशी (१२ वी, एल. टी. सी.) - सहा. ग्रंथपाल ३) श्री मनिष वा. बिडकर (१२वी एल. टी. सी.) – लिपिक ४) श्री. राजू ल. बिडकर (बी. ए.) - ग्रंथालय सहा. यांनाच आहे.

**समारोप :**

मुक्तद्वार वाचनालय हे खऱ्या अर्थाने सर्वांना मुक्त असायला हवे. त्याप्रमाणे वाचनालयाने बालकांपासून ते ज्येष्ठ/श्रेष्ठांपर्यंत आपल्या सेवेचे प्रतिबिंब दाखविले असल्याकारणाने सर्वांना आपले वाचनालय हे आपल्या कुटुंबाप्रमाणे वाटत असते. सर्वांना उन्हापासून सावली, थंडीपासून ऊब देणारे वाटत असल्याने त्यांचा ओढा सातत्याने आपल्या वाचनालयाकडे येत आहे 'मायेची पाखर व प्रेमाची साखर' हे वाचनालयाचे ब्रीद असल्याने आपले मुक्तद्वार खऱ्या अर्थाने सर्वांना आपलेसे वाटत आहे.

**संदर्भ सूची :**

१. यथार्थ, मराठी भाषा गौरव दिन, डिजिटल ई साप्ताहिक, ४ मार्च २०१८

२. वार्षिक अहवाल, सत्कार्योत्तेजक सभेचे स्व. श्रीमती जा. र. देशपांडे मुक्तद्वार वाचनालय, २०१९-२०.

३. चिंचोकर सुनिल, अमृतमहोत्सवी स्मृतीग्रंथ, श्री समर्थ वाग्देवता मंदिर, धुळे, एप्रिल २०१२

४. झेंडे संजय, महाराष्ट्राचे सांस्कृतिक तीर्थ सत्कार्योत्तेजक सभा, दैनिक लोकमत, धुळे, २६ मे २०१८

५. देवरे भूषण, जा. र. देशपांडे वाचनालयाचा उपक्रम, एक समृद्ध ग्रंथ दालन, दै देशदूत, धुळे, १७ जुलै २०१४

६. धुळे वाग्देवता मंदिरात ऐतिहासिक वाङ्मयाचा खजिना, दै लोकमत, धुळे, ३ नोव्हेंबर २०१६

७. पवार रत्नाकर, वाग्देवतेचे मंदिर, दै लोकसत्ता, धुळे, दि २० सप्टेंबर २०१५

८. www.dolmaharastra.gov.in

९. www.dhule.gov.in